म्हाडा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई
उपमुख्य अधिकारी/पुगा, गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.३७२, दुसरा मजला, कलानगर, वांद्रे(पू), मुंबई-५१

जा.क्र.उपमुअ/मि.व्य.१/पुगा/ 5693 /२०२४
दिनांक :- 07/ 10 /2024

**विषय :- बृहतसुचीवरील पात्र मुळ भा /र, अर्जदार यांना वितरीत करावयाच्या अतिरिक्त क्षेत्रफळाच्या शिघ्रसिद्ध गणकदर आकारणीबाबत.**

संदर्भ :- १) मा. उपाध्यक्ष / प्रा. यांचे दि. २२/१२/२०२३ रोजीचे परिपत्रक.
२) मा. उपाध्यक्ष / प्रा. यांची दि. २५/०९/२०२४ रोजीची मान्यता.

**आदेश :-**

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळांतर्गत बृहतसुचीवरील पात्र मुळ भाडेकरु/रहिवाशी, अर्जदार यांना निवासी गाळ्याच्या वितरणाकरिता संदर्भिय क्र. ०१ नुसार निवासी गाळ्यांच्या क्षेत्रफळाचे निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार जुन्या / अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा अतिरिक्त / वाढीव क्षेत्रफळाचा निवासी गाळा बृहतसुचीवरील मुळ भाडेकरु / रहिवाशी, अर्जदार यांना वितरीत झाल्यास, जुने / अनुज्ञेय क्षेत्रफळ वगळता अतिरिक्त / वाढीव क्षेत्रफळाकरिता चालू आर्थिक वर्षाच्या शिघ्रसिद्ध गणकदराच्या १२५% दर आकारणीबाबत दिनांक २२/१२/२०२३ रोजीच्या परिपत्रकात नमुद करण्यात आले होते.

तथापि, उपमुख्य अधिकारी / पुगा / दुवपु मंडळ यांचे दि. २३/०९/२०२४ रोजीच्या प्रस्तावास मा. उपाध्यक्ष / प्रा. यांनी प्रदान केलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भिय ०१ नुसार निर्गमित परिपत्रकातील मुद्दा क्र. १० मध्ये सुधारणा करण्यात येत असून अतिरिक्त / वाढीव क्षेत्रफळाकरिता चालू अर्थिक वर्षाच्या शिघ्रसिद्ध गणकदराची आकारणी ११०% दराने करण्यात येत आहे.

प्राप्त मान्यतेच्या अनुषंगाने सदरहू आदेश तात्काळ आंमलात येत आहेत.

**(मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा यांचे मान्यतेने)**

**मुख्य अधिकारी**
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई